साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2022-2024




* वर्ष २५ वे * अंक ५१ * सोमवार १६/१२/२०२४ * डाक १८/१२/२०२४ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 51 * monday : 16 / 12 / 2024 * post Dt. 18/ 12 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.

# एकच सवय जडलेल्या तरूणावर आरटीएमएस थेरेपीद्वारे उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मानसोपचार तज्ञांचे यश

**जळगाव – गत दोन वर्षांपासून ओसीडी अर्थात एकाच प्रकारच्या सवयीत अडकलेल्या तरूणावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मानसोपचार विभागातील तज्ञांनी आरटीएमएस थेरेपी या पध्दतीचा वापर करून केलेल्या उपचाराला यश आले आहे.**

अमळनेर तालुक्यातील मुकेश पाटील नामक तरूणाला गत दोन वर्षांपासून ओसीडी अर्थात ऑब्सेसिव्ह कम्पलसिव्ह डिसऑर्डर अर्थात सतत हात धुणे, एखादी वस्तू त्याच ठिकाणी नसल्यास अस्वस्थ, बैचेन होणे, चिडचिड होणे, उदास राहणे अशा प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागत होता. त्याच्या ह्या प्रकारात सातत्याने वाढ होत होती. त्याच्या कुटुंबियांनी त्याला मांत्रिकाकडे नेऊन उपचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच्या वागण्यात कुठलाही बदल होत नव्हता. अशा परिस्थितीत या तरूणाला डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मानसोपचार विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी मानसोपचार तज्ञ




डॉ. विलास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ. आदित्य जैन, डॉ. सौरभ भुतांगे, डॉ. उमा चांदूरकर, डॉ. हिमांशू जाधव यांनी या तरूणावर आरटीएमएस या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उपचाराला सुरूवात केली. या उपचाराला सकारात्मक प्रतिसाद मिळू लागल्याने मुकेश पाटील याच्या वागण्यात फरक जाणवू लागला. दहा ते १२ वेळेस आरटीएमएस थेरेपीद्वारे त्याच्यावर उपचार केल्यानंतर त्याची प्रकृती आता पूर्वीप्रमाणे ठणठणीत झाली आहे. तसेच मुकेश पाटील या तरूणावर महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत संपूर्ण मोफत उपचार करण्यात आले.

### काय आहे आरटीएमएस थेरेपी?

रिपीटेटिव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्नेटिक स्टिम्युलेशन (आरटीएमएस) थेरपीची. यामध्ये इलेक्ट्रिक शॉकऐवजी चुंबकीय क्षेत्र दिले जातात. आरटीएमएसचा वापर ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डरसाठी, डिप्रेशन (नैराश्य), ॲनझायटी डिसऑर्डर (चिंता), मायग्रेन, धूम्रपान सोडण्यासाठी देखील केला जातो.

### खान्देशात एकमेव डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपलब्ध

**मानसिक विकाराच्या रूग्णांवर आरटीएमएस (U.S. FDA) मान्यताप्राप्त या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचाराची सुविधा खान्देशात एकमेव डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपलब्ध आहे. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत या थेरेपीद्वारे संपूर्ण उपचार हे मोफत केले जातात. तरी मानसिक विकार असलेल्या रूग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

# अमृतमहोत्सवानिमीत्त डॉ.अर्जुन भंगाळे यांचा सत्कार



**जळगाव – शहरातील प्रख्यात शल्यचिकीत्सक डॉ. अर्जुन भंगाळे यांचा अमृतमहोत्सवानिमीत्त गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

डॉ. अर्जुन भंगाळे आणि डॉ. उल्हास पाटील यांचे अनेक वर्षांपासून कौटुंबिक ऋणानुबंध राहिले आहेत. हा आपुलकीचा ओलावा जपत डॉ. उल्हास पाटील आणि गोदावरी फाउंडेशनतर्फे डॉ. अर्जुन भंगाळे यांना दिर्ज्ञायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गोदावरी फाउंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्य डॉ. अनिकेत पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# डेंग्यूग्रस्त बालकावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ञांकडून उपचार

जळगाव – डेंग्यूग्रस्त बालकावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ञांकडून यशस्वी उपचार करण्यात आल्याने त्याचे प्राण वाचले.

याबाबत माहिती अशी की, पाचोरा तालुक्यातील लोहारी बु. येथील राज जिभू भिल ह्या दहा वर्षीय बालकाला अचानक थंडी वाजून ताप येत होता. याशिवाय डोकेदुखी, अंगदुखी, हाडे आणि सांध्यांमध्ये वेदना देखिल होत होत्या. अशा परिस्थितीत त्याला स्थानिक रूग्णालयात दाखल केले असता आजाराचे नेमके निदान होत नव्हते. त्यामुळे त्याला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या बालरोग विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी बालरोग तज्ञ डॉ. उमाकांत अणेकर, डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर यांनी बालकाची तपासणी केली. तसेच त्याच्या रक्ताच्याही तपासण्या



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

करण्यात आल्या. यात डेंग्यू या आजाराचे निदान करण्यात आले.आजाराचे निदान झाल्यानुसार त्याच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. अवघ्या तिसऱ्याच दिवशी त्याच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होऊ लागली. अवघ्या आठवडाभरात राज या बालकाची प्रकृती ठणठणीत होऊन त्याला रूग्णालयातून सुटी देण्यात आली. या बालकावर महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्यात आले.

# कमी वजनाच्या शिशूचे वाचले प्राण

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील नवजात शिशू तज्ञांचे यश

**जळगाव – प्रसूतीनंतर जन्मलेल्या शिशूचे वजन अत्यंत कमी राहिल्याने त्याच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या एनआयसीयू विभागातील शिशू तज्ञांनी वेळीच उपचार केल्याने त्याचे प्राण वाचले.**

याबाबत माहिती अशी की, रावेर तालुक्यातील खिर्डी येथील सागर तायडे यांच्या पत्नीची प्रसूती झाली. त्यांनी एका गोंडस शिशूला जन्म दिला. जन्मत:च शिशूचे वजन अत्यंत कमी होते. त्यामुळे त्याच्या जिवीताला धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत सागर तायडे यांनी त्यांच्या बाळाला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या एनआयसीयू अर्थात नवजात शिशूंच्या अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल केले. याठिकाणी नवजात शिशू तज्ञ डॉ. सुयोग तन्नीवार यांनी शिशूची तपासणी करून त्याच्यावर तातडीने उपचार सुरू केले. उपचार कालावधीत निवासी डॉ. कुशल धांडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. ओमश्री गुडे यांनी २४ तास अतिदक्षता विभागात शिशूची देखभाल करीत निरीक्षण कायम ठेवले. अनुभव आणि कौशल्याच्या बळावर डॉ. तन्नीरवार यांनी केलेल्या उपचाराला यश आले आणि नवजात शिशूचे प्राण वाचले. उपचारामुळे शिशुच्या वजनात देखिल वाढ होऊन त्याचे सारे आरोग्यविषयक अहवाल सामान्य आले. शिशुचे प्राण वाचल्याने सागर तायडे व त्यांच्या पत्नीने डॉक्टरांचे आभार मानले. विशेष म्हणजे महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत शिशुवर संपूर्ण मोफत उपचार करण्यात आले.



एनआयसीयू ठरतोय नवसंजीवनी
डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील एनआयसीयू अर्थात नवजात शिशूंचा अतिदक्षता विभाग हा सर्व सुविधांनी सुसज्ज आहे. या विभागात उपचारासाठी दाखल होणाऱ्या प्रत्येक शिशुच्या अत्यंत बारीक हालचालींवरही निवासी डॉक्टर, नर्स यांच्याकडून लक्ष ठेवले जाते. जिल्ह्यात सर्व सुविधांनी युक्त असा हा विभाग एकमेव असून आत्तापर्यंत हजारो नवजात शिशूंसाठी एनआयसीयू एक नवसंजीवनीच ठरला आहे.



–डॉ. कुशल धांडे
निवासी डॉक्टर

## संपादकीय

### देवेंद्र ३.०

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ५ डिसेंबर २०२४ एक अविस्मरणीय दिवस म्हणून नोंद होईल. महाराष्ट्राच्या लाडक्या देवाभाऊंनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून मुंबईच्या आझाद मैदानावर लक्षावधी जनसागराच्या साक्षीने शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच विविध राज्यांतील भाजपाचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्री या दिव्य-भव्य सोहळ्यास उपस्थित होते. या शानदार शपथविधी सोहळ्याने सन २०१४ च्या शपथविधी समारंभाची आठवण करून दिली. देवेंद्र पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, तेव्हाही असाच भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. खरं तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना युतीचे सरकार स्थापन करण्याचा राज्यातील मतदारांनी जनादेश दिला असताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लोभापायी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला व देवेंद्र यांची राज्याच्या सिंहासनावर बसण्याची संधी हुकली.२०२४ मध्ये राज्यातील मतदारांनी राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाला निवडून दिले आहे. भाजपने १४८ जागा लढवल्या, पक्षाचे १३२ आमदार विजयी झाले, शिवाय निवडून आलेल्या ५ आमदारांनी भाजपाला समर्थन जाहिर केले. त्यामुळे भाजपाच्या यादीवर आमदारांची संख्या १३७ झाली आहे. महायुतीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ५७ व अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार निवडून आले आहेत. याचा अर्थ राज्याचा मुख्यमंत्री भाजपाचाच व्हावा असाच जनादेश जनतेने दिला आहे. एकनाथ शिंदे व अजितदादांनीही तो स्वीकारला आहे. देवेंद्र हेच महाराष्ट्रात भाजपाचे नंबर १ चे नेते आहेत. देवेंद्र यांना पक्षात कोणीही स्पर्धक नाही किंवा त्यांना पर्यायही नाही. त्यांचे संघटनकौशल्य आणि परिश्रम याला तोड नाही. गेली अकरा वर्षे त्यांनी भाजपाचा राज्यात पाया भक्कम केला व राज्यात पक्षाचा विस्तारही सर्वाधिक केला. त्यामुळेच देवेंद्र हेच राज्यातील पक्षाचे सर्वोच्च व शक्तिमान नेतृत्व आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीचे २३५ आमदार विजयी झाले आणि महाआघाडीला पन्नाशीही गाठता आली नाही. त्यामुळेच आता आपले काय होणार, या भयगंडाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना या तीनही पक्षांना पछाडले आहे. उबाठा सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे तर महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा असे वारंवार सांगत होते. भाजपाशी युती असताना शिवसेनेचे पन्नास-साठ आमदार निवडून येत होते, आता काँग्रेसशी युती करून उबाठा सेनेचे जेमतेम २० आमदार निवडून आले आहेत. जर सत्ता नसेल तर आपल्या पक्षाचे काय होणार, पक्ष कसा वाढणार या चिंतेने उबाठा सेनेला घेरले आहे.

# महापरिनिर्वाण दिनी महामानवास विनम्र अभिवादन

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात

**जळगाव – येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात डॉ. ाबासाहे आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी डॉ. प्रियदर्शनी मून, प्रा अश्वीनी वैद्य, प्रा जयश्री जाधव,प्रा रश्मी टेभुर्णे, प्रा प्रशिक चौहान, इ उपस्थीत होते. डॉ प्रियदर्शनी मून यांनी बाबासाहेबांचे विचार, शिकवण आणि विद्यार्थी दशेत अध्ययन हेच आद्य कर्तव्य असून प्रत्येक विद्यार्थ्याने बाबासाहेबांचे विचार आत्मसात करावे आणि आपले ध्येयसिध्दी गाठावी असा संदेश आपल्या मनोगतातून व्यक्त केले. सर्वप्रथम भारतरत्न डॉ .बी.आर.आंबेडकर यांस विनम्र अभिवादन करण्यात आले .

## गोदावरी कृषी संकुल परिसर

महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवाला विनम्र अभिवादन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न,विश्वभूषण, बोधिसत्व, योग पुरुष, अर्थतज्ञ,अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारे डॉ. भीमराव रामजी आंबेडक

र यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शैलेश तायडे, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनमचंद सपकाळे व तसेच कृषी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रवीण देवरे, राष्ट्रीय सेवा योजना चे कार्यक्रम अधिकारी प्रा. गौरव ढोले, एन. पाटील, परीक्षा विभागाचे विभाग प्रमुख प्रा. शरद पाटील, डॉ ललित जावळे व तीनही महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व आदरांजली वाहिनीयत आले व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनमचंद सपकाळे यांनी त्रिशरण व पंचशील घेऊन कार्यक्रम चे सुरुवात केले. व कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे यांनी महापुरुषाच्या जीवनावर कार्यावर प्रकाश टाकले आणि त्यांच्या प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या, डॉ मिलिंद तायडे आणि आपल्या शब्दात महामानवाचे विचार सांगितले, प्रा. सुरेंद्र इंगोले यांनी जातिभेत निर्मुलनासाठी साहित्य वाचनाचा साला दिला तसेच विध्यार्थीनी कु. चेताली ही महामानवाच्या जिवनकरायच्या आठवणीना उजाळा दिला व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. करण बनसोडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. एन. पाटील यांनी केले. यावेळी कार्यक्रमाची रूपरेषा आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, उपप्राचार्य प्रा. प्रवीण देवरे व याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद



## मेडीकल कॉलेज, हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर

येथे डॉ ाबासाहे आंबेडकर यांना अभिवादन

जळगाव – येथील गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज,हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर मध्ये डॉ. ाबासाहे आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिननिमीत्त अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. हर्षल बोरोले,डॉ. साजिया खान,डॉ. निखिल चौधरी, डॉ. कोमल खंडारे, डॉ. मुकेश चौधरी, डॉ. पालवी चौधरी, डॉ. मयुरी चौधरी हे उपस्थीत होते.

## गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन

जळगाव – सहा डिसेंबर हा दिवस भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर विजयकुमार पाटील,प्रा. प्रवीण फालक(उप प्राचार्य) प्रा.हेमंत इंगळे (अधिष्ठाता) डॉ. ईश्वर जाधव (रजिस्ट्रार) सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. प्रा. तुषार कोळी व प्रा.नकुल गाडगे यांनी डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचा उल्लेख व महापरिनिर्वाण दिन याबद्दल माहिती सांगितली. प्राचार्य डॉ व्ही एच पाटील यांनी, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.सदर कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्रा. नकुल गाडगे यांनी केले.

## डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

जळगाव: महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. उल्हास पाटील यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना वंदन केले. यावेळी डॉ. वैभव पाटील आणि डॉ. अनिकेत पाटील सदस्य गोदावरी फॉउंडेशन यांची उपस्थिती होती. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्याचा उल्लेख व्यक्त केला. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाच्या प्रेरणादायी मूल्यांवर चर्चा झाली. डॉ. वैभव पाटील आणि डॉ. अनिकेत पाटील यांनी बाबासाहेबांच्या सामाजिक न्याय, शिक्षण आणि आत्मसन्मान यावर आधारित विचार मांडले. त्यांनी उपस्थित नर्सिंग स्टाफला बाबासाहेबांच्या आदर्शांवर चालण्याचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.



## भुसावळ येथे पूर्व प्राथमिक क्रीडा दिन उत्साहात

**भुसावळ – डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल भुसावळ येथे पूर्व प्राथमिक क्रीडा दिन २०२४ साजरा केला .**

या दिवशी आमचे छोटे चॅम्पियन आणि त्यांचे पालकांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये एकत्रित भाग घेतला व आनंद लुटला .विद्यार्थी व पालकांनी विविध स्पर्धांमध्ये उस्फुर्त सहभाग नोंदवला.प्रारभी प्रिन्सीपल अनघा पाटील यांच्या हस्ते मशाल प्रज्वलीत करण्यात आली. खो,खोसह विविध मैदानी आणि मनोरंजनात्मक खेळाचे यावेळी आयोजन करण्यात आले. यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन साजरा

**जळगाव – येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात वाढत्या वायू प्रदूषणाबाबत व त्यावर नियंत्रण कसे ठेवावे याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन साजरा केला.**

प्राचार्य विशाखा गणविर, प्रा जेसिंथ धाया, प्रा निर्भय मोहोड, प्रा स्वाती गाडगोणे, प्रा रितेश पडघन, प्रा अल्शेषा मून, प्रा डिव्हायना पवार इ मान्यवर उपस्थीत होते. यावेळी प्राचार्य गणविर यांनी प्रदूषण ही एक प्रमुख जागतिक समस्या आहे आणि हा दिवस साजरा करून प्रदूषित हवा, माती आणि पाण्याचा आपल्या आरोग्यावर होणारा परिणाम जाणून घेण्यासाठी आपण विद्यार्थ्यांना मदत करू शकतो. पुढे




ोलतांना त्यांनी मानवी निष्काळजीपणा आणि औद्योगिक उत्सर्जनामुळे होणारे पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण कायद्यांचा अवलं करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस समर्पित आहे.

यावेळी रिल्स, निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये बीएस्सी चतुर्थ सत्राचे एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाचे तांत्रिक सूत्रसंचालन यांनी तर आभार यांनी मानले यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षके तर विदयार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# ॲग्रोवर्ल्डच्या प्रदर्शनात डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाच्या स्टॉलला लाखो नागरिकांची भेट

**जळगाव – येथील एकलव्य क्रीडा संकुल येथे नुकत्याच पार पडलेल्या ॲग्रोवर्ल्डच्या कृषि प्रदर्शनास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. आयोजक संचालक शैलेंद्र चव्हाण यांनी ही माहिती दिली.**

जळगावच्या डॉ. उल्हास पाटील कृषि महाविद्यालयाचा या प्रदर्शनात बी डोमेन स्टॉल नं ६ वर स्टॉल लावण्यात आला होता. हा स्टॉल शिक्षण व संशोधन संचालक डॉ. अशोक चौधरी यांच्या मार्गदर्शनानुसार लावण्यात आला या स्टॉलवर प्रा. मोहित बनपूरकर, मधुकर पांगळे , दीपक काशीकर, हे कर्मचारी व सुमीत चौधरी, साक्षी पाटील व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी हजर राहून मार्केटिंग कशी करावी ह्याची प्रात्यक्षिके केली.म डॉ. संतोष राठी, प्राचार्य सहकार्य-सारिका पाटील, मनोज नेमाडे, प्रशांत कोळी,

## ॲग्रोवर्ल्ड प्रदर्शनात बेकरी उत्पादनांना प्रचंड प्रतिसाद



ललिता कोळी इ देखिल उस्स्थीती देवून नागरिकांना बेकरी उत्पादनाबाबत माहिती दिली. यावेळी जवळपास ५००० च्या वर नागरीकांनी भेट तर दिलीच पण ५०० च्या वर नागरिकांनी बेकरी उत्पादन खरेदी देखिल केली. या प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषि विदयार्थ्यांना व्यासपिठ मिळाले असल्याची भावना बोलून दाखवली.




Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज,हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर

# प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा व्हाईट कोट आणि चरक शपथ ग्रहण समारंभ उत्साहात



**जळगाव – येथील गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ.गुणवंतराव सरोदे आयुर्वेद मेडीकल कॉलेज, हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटरच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी व्हाईट कोट आणि चरक शपथ ग्रहण समारंभ आज संपन्न झाला.पांढरा कोट समारंभ आयोजित करण्यामागचा उद्देश हा पांढरा कोट (एप्रन) सजवणे पदवीच्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रात सामील करून घेत पांढऱ्या कोटचे महत्त्व समजण्यास मदत करणे असा होता.**

यावेळी संस्थाध्यक्ष माजी खा.डॉ. उल्हास पाटील,सदस्य हदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील, शल्यचिकीत्सक डॉ. अनिकेत पाटील, वैद्यकिय संचालक डॉ. एन एस आर्विकर, अधिष्टाता डॉ प्रशांत सोळंके, वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरेपीचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. माया आर्विकर आणि आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्टाता डॉ. हर्षल बोरोले,डॉ. साजिया खान,डॉ. निखिल चौधरी, डॉ. कोमल खंडारे, डॉ. मुकेश चौधरी, डॉ. पालवी चौधरी, डॉ. मयुरी चौधरी हे उपस्थीत होते.

कार्यक्रमाची सुरुवात व्यासपीठावरील मान्यवरांना प्रेमाचे प्रतीक अर्पण करून, त्यानंतर सरस्वती वंदन व दिपप्रज्वलनाने झाली तसेच माजी खा. स्व.डॉ गुणवंतराव सरोदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करू न अभिवादन करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. अनिकेत पाटील यांनी जागतिक स्तरावर आयुर्वेदाचे महत्व विषद करत संस्कृत भाषेला आयुर्वेदात अनन्यसाधारण महत्व आहे. व्हाईट कोट परिधान केल्यानंतर समाजासाठी नैतिक जबाबादारी आणि जबाबदारीची भावना बाळगणे हे कर्तव्य आहे असे पटवून सांगितले.

डॉ. वैभव पाटील यांनी यशासाठी दृढनिश्चय ही गुरुकिल्ली आहे असे सांगून शुभेच्छा व्यक्त केल्यात. माजी खा डॉ. उल्हास पाटील यांनी आपल्या भाषणात प्रवेशीत विदयार्थी व पालकांचे आभार मानत आपल्या पाल्यास सक्षम वैदय बनवणे ही आमची जबाबदारी असून आम्ही जागतिक स्तरावरील सुविधा उपलब्ध करून देवू पुढे बोलतांना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा जागृत करणे, त्यांना प्रेरणा देणे, जेणेकरून ते देशाचे जबाबदार नागरिक बनतील. त्यांच्यावर असलेली जबाबदारी केवळ त्यांच्या व्यवसायाचीच नाही तर त्यांचे कुटुंब, नातेवाईक आणि समाजाचीही आहे चांगले करा आणि चांगले व्यक्तीमत्व उठून दिसेल असे आमचे ध्येय आहे असे सांगितले. सोहम सचिन जोशी यांनी एक यशस्वी वैद्य तयार होतांना जी वागणूक आणि नियमाचे पालन शिकवणारी चरक प्रतिज्ञा सोहम सचिन जोशी यांनी संस्कृत मधून तर हिप्पोक्रेटीक प्रतिज्ञा विरेंद्र ताडे यांने इग्रजीतून दिली. यानंतर रूग्ण आणि वैद्य यांच्यातील संस्कृत संवादावर नाटीका सादर केली.

डॉ. एन एस आर्विकर यांनी म्युझीक थेरेपीतून आरोग्या मिळणारे फायदे तसेच याबाबतचे संगीतातील राग व त्याचा आरोग्यसंबंधीत उपयोग विषद केला.डॉ प्रशांत सोळंके यांनी वैद्यकिय क्षेत्रातील तिनही थेरेपीचे आपआपले महत्व विषद करून संस्था हुशार विदयार्थी घडवण्यासाठी सर्वोतपरी तयार असल्याची माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हर्षा वानखेडे, रूतूजा हेलगे, अनुराधा शिंगोटे, धनश्री कुकडे यांनी तर आभार यसरा देशमुख, निर्सगा जाधव व सचिन सुराणा यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशासन अधिकारी चेतन चौधरी यांच्या मार्गदर्शनानुसार मोहीत येवले, हेमंत जंजाळकर यांचेसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा यांनी परिश्रम घेतले.

### थीम: योग्य मार्ग निवडा: माझे आरोग्य, माझा अधिकार

# ईकोच्या सहकार्याने ऑनलाईन जनजागृती कार्यक्रम

**जळगाव –दि. १ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून ईको (समुदाय आरोग्य सेवा परिणामांसाठी विस्तारसमुदाय आरोग्य सेवा परिणामांसाठी विस्तार) यांच्या सहकार्याने ऑनलाईन एड्स जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

उपक्रमाचा उद्देश एड्स प्रतिबंध आणि उपचाराविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असल्याचे अधोरेखित करणे होता.कार्यक्रमाचे उद्घाटन मिसेस जीना प्रदीप (उपमहासंचालक एमओएचएफडब्ल्यु, भारत सरकार) व डॉ. संदीप भल्ला (सहयोगी उपाध्यक्ष इको) यांच्या उपस्थितीत झाले. विशेष पाहुणे व वक्त्यांमध्ये मिसेस रुपाली दीक्षित (काउन्सेलर, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, जळगाव) व मिसेस प्रियांका बन्सल (असिस्टंट प्राध्यापक, होली फॅमिली कॉलेज ऑफ नर्सिंग) यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे आयोजन मिसेस विशाखा गणवीर व डॉ. प्रियदर्शनी मून यांनी केले.



उद्घाटनपर भाषणादरम्यान, प्रमुख पाहुण्यांनी एड्सच्या प्रतिंधात्मक उपायांवर भर देत, सर्वांसाठी सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमादरम्यान, एड्स प्रतिबंध, एड्सशी संबंधित कलंक निर्मूलन, एड्सबाधित व्यक्तींचे हक्क यासंबंधी सखोल माहिती देण्यात आली. सहभागींनी प्रश्नोत्तरे आणि चर्चासत्रांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला, ज्यामुळे कार्यक्रम अधिक माहितीपूर्ण व प्रभावी ठरला. पोस्टर आणि व्हिडिओद्वारे एड्सविषयी महत्त्वाचे संदेश पोहोचवण्यात आले.कार्यक्रमाचा समारोप भविष्यातही एड्सविरोधी जनजागृतीसाठी प्रयत्नशील राहण्याच्या वचनासह करण्यात आला.

आयोजकांनी ईको टीम आणि सर्व सहभागींचे आभार मानले.हा उपक्रम लोकांमध्ये एड्स प्रतिबंध आणि उपचारांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच आरोग्याचा अधिकार सगळ्यांसाठी समानरित्या सुनिश्चित करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.




# जागतिक एड्स दिन प्रभात फेरीत गोदावरी नर्सिंगचा सहभाग

**जळगाव – दि. १ डिसेंबर जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एच आय व्ही/एड्सविषयक जनजागृती वाढवण्यासाठी युवा युवतींमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव येथे प्रभात फेरी मध्ये सहभाग नोंदविला.**

प्रभात फेरीमध्ये १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग नोंदविला आणि एड्सविषयक माहिती तसेच प्रतिंधात्मक उपाय यावर जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी विविध स्थानिक ठिकाणी फलक आणि पोस्टरसह एड्सविषयक संदेश प्रसारित केला. यावेळी विद्यार्थ्यांना समाजातील लोकांमध्ये जागरूकता पसरविण्याची महत्त्वाची भूमिका निभावण्यास प्रेरित करण्यात आले.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आणि एड्सच्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपली भूमिका प्रभावीपणे पार

## चिनावलात भरला आरोग्याचा मेळा

**चिावल ता रावेर – डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने चिनावल ता रावेर येथे मोफत शिबिरातून आरोग्याचा मेळा भरवण्यात आला.**

या शिबिरात रूग्णालयातील मेडीसिन, सर्जरी, नाक,कान,घसा, नेत्र, अस्थीरोग आणि त्वचा विभागातील तज्ञांनी १०७ नागरिकांची तपासणी केली. यातील २५ रूग्णांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

‘* Provide with clear goals and the freedom to decide how to achieve them.
* Share your vision, objectives and expectations repeatedly and explicitly.
* Cultivate the ability to make informed and well-thought-out decisions.
* Show enthusiasm for your work and passion for the mission.
* Regularly check-in to assess progress and procure constructive feedback.
* Regularly schedule one-on-one meetings to freely discuss thoughts on work.
* A positive workplace fosters collaboration, respect and creativity.

* स्पष्ट लक्ष्यों और उन्हें प्राप्त करने के तरीके का निर्णय लेने की स्वतंत्रता प्रदान करें।
* अपनी दृष्टि, उद्देश्यों और अपेक्षाओं को बार–बार और स्पष्ट रूप से साझा करें।
* सूचित और अच्छी तरह से विचार किए गए निर्णय लेने की क्षमता विकसित करें।
* अपने काम के लिए उत्साह और मिशन के लिए जुनून दिखाएं।
* प्रगति का आकलन करने और रचनात्मक प्रतिक्रिया प्राप्त करने के लिए नियमित रूप से चेक–इन करें।
* काम पर विचारों पर खुलकर चर्चा करने के लिए नियमित रूप से एक–एक करके बैठकें निर्धारित करें।
* एक सकारात्मक कार्यस्थल सहयोग, सम्मान और रचनात्मकता को बढ़ावा देता है।

# पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय संशोधन सादरीकरण कार्यक्रम उत्साहात संपन्न



**जळगाव –गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय संशोधन सादरीकरण कार्यक्रमाचा आज समारोप करण्यात आला. गोदावरी अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्षतर्फे आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भरभरून सहभाग नोंदवला.**

**कार्यक्रमाचा मुख्य उद्देश**

या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना संशोधन प्रस्ताव सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे व त्याद्वारे संशोधन कौशल्ये वृद्धिंगत करणे हा होता. पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर संशोधन प्रकल्प सादर केले. समुदाय आरोग्य सेवा: प्रगत आरोग्य सेवा मॉडेल्सचा प्रभावी वापर. प्रसूती व स्त्रीरोगविज्ञान: महिलांच्या आरोग्य व प्रसूती काळातील सुधारणा. बाल आरोग्य नर्सिंग: बालकांच्या आरोग्य समस्या व उपचार.मानसिक आरोग्य जागरूकता: समाजातील मानसिक आरोग्याच्या समस्यांसाठी उपाय.वयस्कर आरोग्य नर्सिंग: वृद्ध व्यक्तींसाठी विशेष काळजी व उपचार. नवजात काळजी: नवजात

### गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचा उपक्रम

शिशूंवरील उपचारातील नवकल्पना. तंत्रज्ञान व नर्सिंग शिक्षण: नर्सिंग शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या विषयावर प्रमुख संशोधन सादर करण्यात आले. वरिष्ठ प्राध्यापक आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांचा आढावा घेतला. सखोल मार्गदर्शन व सूचनांमुळे विद्यार्थ्यांचे सादरीकरण अधिक गुणवत्ता पूर्ण झाले.कार्यक्रमात प्राचार्या विशाखा गणवीर, प्रो. आश्विनी वैद्य, प्रो. जॅसिंथ धय्या, प्रो. मनोरमा, प्रो. मीनाव देवी, , डॉ. प्रियदर्शिनी मून, प्रो. निम्मी व्हार्गीस, प्रो. पीयूष वाघ, प्रो. अश्विनी मानकर ,प्रो. हेमांगी मुरकुके , प्रो. निर्भय मोहदे व इतर प्राध्यापकांनी सहभाग घेत विशेष उपस्थिती दिली. महाविद्यालयाने या कार्यक्रमाला वार्षिक स्वरूप देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नर्सिंग क्षेत्रातील संशोधनाला चालना मिळेल व विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या तयार होण्यास मदत होईल.गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचे व्यवस्थापन, शिक्षक व विद्यार्थी यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगदान देणार्याचे विशेष आभार मानले.

